दैनिक सागर रायगड Raigad

E-mail: dailysagar@gmail.com

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, मुंबईसह पाच स्वतंत्र आवृत्त्या

शनिवार दिनांक ९-५-२००९ ◆ Postal Regi. No. RTG/6/2009-11 ◆ पृष्ठे-८ ◆ किंमत रु.२.००



अग्निहोत्र कृषि पध्दतीची माहिती उपस्थितांना देताना वेदविज्ञान संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. ग. राजीमवाले

गेल्या काही दशकापासून शेतजमिनीतून अधिक उत्पादन मिळवण्याच्या लोभापायी दूरगामी परिणामांचा विचार न करता रासायनिक खते व किटकनाशकांचा सर्रास वापर केला जात आहे. परिणामी आपले अन्न धान्य, फळे आणि भाज्या यामध्ये रासायनिक किटक नाशकांचे विषारी अंश मानवी शरीराच्या सहनशक्तीच्या पलीकडे असणाऱ्या प्रमाणात सापडू लागले आहेत. जगभर कॅन्सर सारख्या दुर्धर व्याधींच्या वाढत्या प्रमाणाचे हेही एक महत्त्वाचे कारण असावे. असे वैद्यकिय क्षेत्रातील संशोधकांना जाणवत आहे. यामुळे शुद्ध व सकस अन्न पिकवण्याच्या कल्पनेतून नैसर्गिक कृषि पद्धतीचा पुन्हा अंगीकार केला जावा अशी निकडीची जाणीव जगभर निर्माण होत आहे. "अग्निहोत्र कृषी पद्धत" ही असा प्रकारची आदर्श पद्धती आहे. अर्थात नैसर्गिकपणे शेती कसण्याच्या विविध प्रकारांपैकी तुम्ही स्वत:ला आवडेल रूचेल अशा कोणत्याही पद्धतीचा वापर करण्याचे ठरविले असले तरी त्याबरोबर सहाय्यभूत म्हणून "अग्निहोत्र कृषी पद्धती" चा उपयोग करू शकता. त्यामुळे तुम्हाला मिळणारा सुपरिणाम अधिक पटीने वाढला आहे. असा अनूभव येईल. या पुस्तिकेत जिज्ञासू शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठराव्यात या हेतूने "अग्निहोत्र कृषी पद्धती" कशा प्रकारे प्रत्यक्षात वापरात आणावी या विषयीच्या सूचना पद्धतशीरपणे देण्याचा प्रयत्न केला आहे. यातील माहीती प्राचीन वेदवाङ्मयातील नोंदी "वेद विज्ञान अनूसंधान" केंद्राच्या माध्यमातून हाती घेतलेले संशोधन व या पद्धतीने शेती करणाऱ्या जगभरातील अनेक व्यक्तींच्या स्वानुभवावर आधारित आहे. या नैसर्गिक शेती पद्धतीचा अवलंब करून शुद्ध - सकस अन्न अवश्य पिकवा असे मी तुम्हाला आवाहन करतो.

### अग्निहोत्र कृषी पद्धत

अग्निहोत्र कृषी पद्धत ही शुद्ध व स्वस्थ वातावरणात शेती करण्याची सर्वकष रीत आहे. यज्ञाच्या माध्यमातून निसर्गचक्रांचे संतुलन राखण्याच्या वेदांनी कथन केलेल्या तत्वांवर ती आधारित आहे.

### शेतीविषयी वेदग्रंथातील उल्लेख

वेद हे मानवमात्रांचे अत्यंत प्राचीन ज्ञानभंडार आहे. वेद हा शब्द संस्कृत भाषेतील "विद्" या धातूपासून तयार झालेला असून "ज्ञान" हा त्याचा अर्थ आहे. मनुष्य व निसर्गचक्रे यांचा समतोल व सुखमय परस्पर साहचर्याची चिरंतन तत्वे वेदांनी कथन केली आहेत. वेद हे इश्वरनिर्मित आहेत. वेदांचे ज्ञान, जात " पात, देश, रंग, स्त्री " पुरूष असा सर्व भेदाभेदांच्या पलीकडे जाऊन मानवमात्रांचे कल्याणासाठी हजारो वर्षांपासून गुरू " शिष्य परंपरेने प्रयत्नपूर्वक सांभाळले व जोपासले आहे.

### अग्निहोत्र प्रक्रियेचा वनस्पतीवर लाभकारक परिणाम

वेदांनी वर्णन केलेल्या यज्ञ प्रक्रियेचा "अग्निहोत्र" हा पायाभूत प्रकार आहे. अग्नीच्या माध्यामातून वातावरण शुद्धीची अग्निहोत्र ही सहज , सरळ सोपी प्रक्रिया आहे. गायीचे तूप व अखंड तांदूळ यांच्या ज्वलनातून उत्पन्न होणारे शुद्ध व औषधी वायू , मंत्रांच्या उच्चारणांच्या कंपनांचा परिणाम , ताम्र धातूचे शुद्धिकारक परिणा, पिरॅमिड या विषेश आकारातून परावर्तीत होणाऱ्या सूक्ष्म लहरी , सूर्योदय सूर्यास्ताच्या संधिवेळा इत्यादी घटकांचा एकत्रितपणे परस्परांवर होणाऱ्या सुपरिणामातून अग्निहोत्राच्या प्रक्रियेतून वातावरणाची शुद्धी क्रिया होते.

नैसर्गिक पद्धतीने शेती करू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने

अविभाज्य घटक आहेत. ज्याप्रमाणे प्राणी व मनुष्या यांचे जीवन सुपिक जमीनीवरती अवलंबून असते, त्याचप्रमाणे जमिनीची सुपिकता शेतातील प्राणी व मातीतील उपयुक्त किड व अळ्या यांच्यावर अवलंबून असते. शेतावरील प्राण्यांच्या गोठ्यातील व खुराड्यातील शेण, मूत्र व लेंड्या या एक उत्कृष्ट सेंद्रिय खत म्हणून वापरल्या जातात.

शिवपुरी अक्कलकोट , जि. सोलापूर येथील वेदविज्ञान अनुसंधान संस्था ही एक सेवाभावी संस्था असून अग्निहोत्राच्या प्रचार प्रसाराचे कार्य करीत आहे. समाजाच्या सर्व स्तरांमधील विविध जात, धर्म , पंथ व देशांमधील अग्निहोत्र आचरणकर्ते गेल्या अनवेक वर्षांपासून सेवाभावाने ही संस्था चालवीत आहेत.

अग्निहोत्रामुळे मानवी जीवनात व सर्व प्राणीमात्रावर होणाऱ्या सुपरिणामांचा अभ्यचास करून त्या विषयाची पुस्तके प्रकाशित करणे , चर्चा सत्रे, प्रचार शिबिरे भरवणे व प्राचारासाठी इतर कार्यक्रमांचे आयोजन करणे हे संस्थेचे कार्य आहे. अग्निहोत्राच्या परिणामांचा वैज्ञानिकरित्या अभ्यास करणे व प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या संशोधनात्मक कार्य करणे तसेच जगभरातून अग्निहोत्रावर होत असलेल्या संशोधनाची नोंद ठेवून संशोदकांना मार्गदर्शन करणे हे काम संस्थेतर्फे केले जात आहे.

**डॉ. श्री. ग. राजीमवाले**
**अध्यक्ष वेदविज्ञान अनुसंधान**
**०२१८१-२२०७०८**
**www.shivpuri.org**